
# स्वप्ने भरत जाणारी मुमताज

जॉली रोहतगी

राम सोनी



वाचन पातळी ४

Pathfinder
C12063


# स्वप्ने भरत जाणारी मुमताज

लेखन : जॉली रोहतगी

चित्रं : राम सोनी

मराठी अनुवाद : संध्या टाकसाळे





ईदचा सण आला आणि लखनौ शहर उत्साहानं गजबजून गेलं. नवे-नवे कपडे घालून लोक बाजारातून हिंडत होते. तोंडाला अगदी पाणी सुटेल अशी लज्जतदार मिठाई दुकाना-दुकानांत दिसत होती. जिलबी, लाडू, दिलबहार, चमचम झालंच तर चटकदार कबाब, गरमागरम खमंग आलू टिक्की.... आणि बरंच काही, सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ, रंगीबेरंगी कपडे, झगमगते चांदीचे दागिने यांनी चौकातली दुकानं अगदी सजली होती.

भरपूर भेटवस्तू आणि मिठाई भरलेले पानांचे द्रोण घेऊन मेहरुन्निसा, कमरुन्निसा आणि त्यांचा भाऊ अझहर मियाँ चालले होते. ईदच्या निमित्तानं भेट मिळालेले, अप्रतिम चिकनकारी केलेले आपले नवे कपडे अभिमानानं मिरवत होते. मेहरुच्या कुडत्यावर गडद गुलाबी रंगाची फुलं भरली होती तर कमरुच्या कपड्यांवर फुला-पानांची नक्षी. अझहर मियाँ आपल्या नाजूक विणकामाच्या टोपीवर विशेष खूष दिसत होते.

अब्बू म्हणजे त्यांचे वडील कंत्राटदार होते. चौकातले मोठे दुकानदार अब्बूंना कापड द्यायचे आणि अब्बू कशिदाकाम, भरतकाम करणाऱ्या बायकांकडून त्यावर चिकनकारी, कशिदाकारी करून घ्यायचे. दुकानदार त्या बायकांना पैसे द्यायचे आणि अब्बूंनाही कामाप्रमाणे कमिशन मिळायचं.

अब्बूंना यातून बऱ्यापैकी पैसा मिळत असल्यानं अम्मीला इतर बायकांसारखं भरतकाम करावं लागायचं नाही. कमरु आणि मेहरु मशिदीतल्या मदरश्यामध्ये शिक्षण घेत होत्या तर अझहर मुलांच्या शाळेत जात असे. कमरु आणि मेहरु थोडं फार भरतकाम करत; पण त्यांचं त्याबद्दल जरा जास्तच कौतुक व्हायचं. कारण उघड होतं, त्यांच्या

अब्बूंनीच तर वस्तीतल्या बायकांना हे काम मिळवून दिलं होतं आणि त्यातून चार पैसे त्यांना मिळत होते.

अझहर एकदम थांबला आणि म्हणाला, ''अरे, घरात आपली आणखी एक बहीण आहे. आणि तिची आठवणच आपल्या कुणाला नाही! तिनं नवे कपडेही घातलेले नाहीत.''

''मुमताज काही आपली सख्खी बहीण नाही, मावस बहीण तर आहे आणि तिला चालता येत नाही म्हणून ती आपल्याकडे आलीय.'' दोघी एकदम फिसकारल्या. ''पण तिच्यासाठी मिठाई घेऊन जायला हवी हे मात्र बरोबर हं.''

एव्हाना मुलं गोमती नदीच्या किनाऱ्यावर भरलेल्या जत्रेत पोहोचली होती. काय उत्साहानं सळसळणारं वातावरण होतं ते! रंगीत रिबिनी, काचेच्या बांगड्या, चमचमत्या माळा, मातीचे प्राणी, पक्षी, बाहुल्या, सैनिक....! अशा अनेक गोष्टी विकायला होत्या. प्रत्येकाच्या आवडीचं काही ना काही तर तिथे होतंच. त्या सगळ्या जल्लोषात ही मुलं आपल्या मावस बहिणीला विसरून गेली.



अबिदा खालाकडे, म्हणजे या मुलांच्या मावशीच्या घरात मुमताज

एकटीच बसली होती. जवळच कोपऱ्यात तिच्या कुबड्या होत्या. तिचे हात भरतकाम करत होते; पण मन मात्र होतं, लांब... तिच्या हरदोई या गावी. तिथे तिची अम्मी आणि दोन बहिणी राहत असत. त्यांनाही माझी अशीच आठवण येत असेल का, जेवढी मला येते आहे?

मुमताजचे वडील वारल्यानंतर घरात पैशाची नेहमीच तंगी असायची. एक दिवस अबिदा खालानं सुचवलं की, वस्तीतल्या बायकांनी दुपारी एकत्र येऊन भरतकाम करायला काय हरकत आहे?

तेव्हापासून बायका रोज कुणाच्या ना कुणाच्या परसदारी एकत्र येऊन बाजेवर किंवा चटईवर बसून रेडिओवरची गाणी ऐकत-ऐकत भरतकाम करू लागल्या. या बायकांना अधूनमधून चहा देण्याची जबाबदारी मुमताजवर होती. वयस्क बायका मात्र आपापल्या पानांच्या डब्यांतून विडे काढून चघळत बसायच्या. चहाबरोबर गरमागरम गावगप्पाही होत. पण हात मात्र अखंड चालू. थेट संध्याकाळीच आपापलं भरतकाम आवरून त्या सगळ्या घरी जायला निघायच्या. रात्रीचा स्वयंपाक वाट बघत असायचा ना!

भरतकाम केलेलं कापड अबिदा खाला लखनौला कमरु आणि मेहरुच्या अब्बूंकडे पाठवायची आणि अब्बू त्या कामाचे पैसे आणि आणखी कापड पाठवायचे.

थोड्याच दिवसांपूर्वी, चिकनकारीमधले काही नवे टाके शिकण्यासाठी मुमताज, आबिदा खालाबरोबर लखनौला आली होती आणि परत गावी जाऊन तिथल्या बायकांना ते शिकवणार होती. मुमताज आपल्या घरापासून खूप दूर आली होती, तरी एक चांगली गोष्ट म्हणजे, तिचा खास आवडता पोपट मुनिया आणि लक्का आणि लोटन ही कबुतरांची जोडी तिच्याजवळ होती. हरदोईहून येताना आपल्याबरोबर त्यांनाही ती घेऊन आली होती.

हे तिन्ही पक्षी अगदी हुषार होते. लक्का उंचच उंच भरारी घ्यायचा आणि लोटन कसरती करण्यात पटाईत. कधी उलट सुलट कोलांट्या उड्या तर कधी नाच. मुनिया सुद्धा





काही कमी नव्हती. माणसांच्या बोलण्याची ती अगदी हुबेहूब नक्कल करायची. मुमताजच किती तरी वेळेला मुनियाला आपली स्वतःची नक्कल करून दाखवायला सांगायची. मुमताज काम करायला बसली की लक्का-लोटनची जोडी दाणे टिपून उंच उडत ढगात लुप्त व्हायची आणि परत थोड्या वेळानं दाणे टिपायला हजर.

लखनौला आल्यावर मुमताजला आणखी एक मित्र मिळाला होता. शेजारच्या भाजीवाल्यांचा आठ वर्षांचा मुन्नू. तो आपल्या वडिलांबरोबर भाजी विकत फिरायचा आणि आपल्या खास आवाजात ''भाजी घ्या भाजी.... यऽऽ'' अशी हाळी द्यायचा. नुकतीच मुमताजची त्याच्याशी दोस्ती झाली होती. मुमताज आपला नाश्ता त्याच्याबरोबर वाटून घ्यायची. दोघं लक्का-लोटनच्या करामती बघत बसायचे.

ईदच्या दिवशीही दोघं पक्ष्यांच्या गमती बघत बसलेले असताना मुन्नूच्या लक्षात आलं की मुमताज खूप उदास दिसते आहे. इतकी की, रडू सुद्धा फुटेल तिला! त्यानं विचारलं, ''आपा, आज तू गप्प गप्प का? गावची आठवण येतेय का? तिथे आणखीही पक्षी आहेत तुमच्याकडे?''

मुमताजनं आपलं भरतकाम पुन्हा सुरू करत म्हटलं, ''नाही. पक्षी नाहीत आणखी. अम्मी आणि रेहाना, सलमा या माझ्या दोघी बहिणी आहेत तिथे.''



मुन्नूनं विचारलं, ''तुला हे भरतकाम कुणी शिकवलं?''

''आमच्या तीन पिढ्या चिकनकारी करतायत. मी माझ्या आईकडून आणि आई आजीकडून ही कला शिकली.'' मुमताज म्हणाली,

‘‘माझ्या आईची आई ही लखनौच्या फतेहगंज भागातली होती. तो भाग चिकनकारी आणि कटवर्कसाठी खूप प्रसिद्ध होता. आजी मला लखनौचे नवाब आणि त्यांच्या बेगमांचे किस्से सांगायची. बारादारी म्हणजे बारा दारांच्या महालाची गोष्ट, गझला आणि शेरो-शायरीच्या मैफिली असंही बरंच काय काय सांगायची आणि तिच्या हातची बिर्याणी, कबाब आणि शेवया एवढ्या लज्जतदार असायच्या की सांगतानाही तोंडाला पाणी सुटतंय. ती नेहमी चिकनकारी केलेली पांढरी ‘चादर’, म्हणजे शालीसारखं डोक्यावरून आणि खांद्यावरून गुंडाळायचं तलम वस्त्र घ्यायची. अजून आहे ती चादर माझ्याजवळ तिची आठवण म्हणून.’’ आजीच्या गोष्टी सांगताना मुमताजचा चेहरा उजळला. ‘‘माझ्या आईलाही मी सतत चिकनकारी, कशिदाकाम करतानाच बघितलंय. दिवसभर कपड्यातून सुई-दोरा सतत वर-खाली सफाईनं फिरत राहायचा.’’



‘‘म्हणजे, ती कधी घराबाहेरच नाही पडायची?’’ मुन्नूनं आश्चर्यानं विचारलं.

‘‘अगदी क्वचित. कधी भाजी आणायला किंवा नातेवाइकांना भेटायला. रेहाना आणि सलमाही खूप कमी वेळा बाहेर जातात आणि जेव्हा जातात, तेव्हा डोक्याला ओढणी गुंडाळून! आई बुरखा घालते. माझ्या बहिणी शाळेतही गेलेल्या नाहीत. मी मात्र आठवीपर्यंत शिकल्येय आणि आता मात्र आई आणि बहिणीकडून चिकनकारी-भरतकाम शिकते आहे.’’

‘‘अरे वा! तू शाळेत जात होतीस.’’ मुन्नूला त्याचं अप्रूप होतं कारण लहानपणापासून वडिलांनाच मदत करत असल्यामुळे त्याला शाळेत जायला मिळालं नव्हतं.

''हो चिकनकारी, कशिदाकाम करणाऱ्या आमच्या समाजात मुली फारशा शाळेत जात नाहीत. माझ्या आईलाही लिहिता- वाचता येत नाही. तिला तर हेही कळायचं नाही की आपण केलेल्या कामाचे व्यापाऱ्याकडून किती पैसे यायला हवेत. सुरुवातीला मी तिला थोडा हिशेब शिकवला. नंतर पैशाची गरज पडली आणि मग मीही भरतकाम करायला लागले. ''मुमताज बोलता-बोलता एकदम थांबली आणि हळूवारपणे म्हणाली, कधी-कधी खूप आठवण येते तिची मग मी रात्रभर रडत बसते.''

तिचं मन दुसरीकडे वळवावं म्हणून मुन्नूनं पटकन विषय बदलत तिला विचारलं, ''आपा, तुला स्वप्नं पडतात का ग रात्री?''

''हो. पडतात तर! स्वप्नात मी लक्का आणि लोटन यांच्यासारखी मोकळ्या निळ्या आभाळात उंच उंच उडते आणि किती ठिकाणांची सफर करून येते. कधी वाटतं आजी सुद्धा भेटेल एखाद्या दिवशी.'' मुमताज म्हणाली.

हो ना, मग जा बरं, झटकन आजीची ती चादर घेऊन ये. मी तुला एक खेळ शिकवतो'' मुन्नू रुबाबात म्हणाला. त्यानं तिला चाँद पाशाविषयी सांगितलं. चाँद पाशा हा एक आजारी वृद्ध जादूगार होता. आपल्या वडिलांबरोबर हिंडताना त्याच्याशी मुन्नूची ओळख झाली होती. त्यानं मुन्नूला एक अतिशय गमतीची जादू शिकवली होती. मुन्नूला वाटत होतं की ती जादू बघून का होईना, मुमताजचं दुःख जरा हलकं होईल.

मुमताजनं आतून चादर आणली. ही चादर आजीनं आपल्या हातानं भरली होती. डोळे ठरणार नाहीत इतकं सुंदर काम होतं ते. एक-एक टाका नेटका आणि अगदी सफाईदार. काठाची धावती टीप सुद्धा अगदी बारीक आणि एकसारखी. आपल्या नातीला तिनं दिलेली ही शेवटची भेट होती.

''आता या चादरीचं एक टोक तू पकड. दुसरं मी पकडतो हं. आता एक मोठा श्वास घे आणि अशा एखाद्या गोष्टीचा विचार कर जी तुला अगदी हवीच आहे.'' मुन्नू म्हणाला.





मुमताज विचार करायला लागली. कल्पना करायला लागली की आपण ढगांच्या वरून उडत आहोत. नवी ठिकाणं बघतो आहोत. नव्या लोकांना भेटतो आहोत. तिला वाटू लागलं की चादरीच्या काठाच्या धावत्या टीपेसारखी तीही धावते आहे -वेगानं, आणखी आणखी वेगानं. चादरीचं तिसरं टोक लोटननं आपल्या चोचीत धरलं आणि लक्कानं चौथं... आणि ते सगळे अलगद वर उडू लागले. खालची जमीन लांब जात होती आणि आकाश जवळ येत होतं.

ते सगळे जण एका खूप दूरच्या, अनोळखी शहरात येऊन पोहोचले. तिथले डोंगर निळे होते. स्वच्छ, निळ्या आकाशात अनेक रंगांचे पक्षी उडत होते. खालच्या दरीमध्ये मधुर फळांनी लगडलेली झाडं होती आणि मोहक फुलांनी बहरलेल्या बागा होत्या. मुमताजला घेऊन लक्का आणि लोटन एका निळसर हिरव्या सरोवराच्या काठावर उतरले. तिथे लांब, गरम कपड्यांतले, मान खाली घालून आपल्या कामात अगदी मग्न झालेले काही लोक बसले होते. अगदी बारीक सुयांनी ते लोकरीच्या शालीवर भरतकाम करत होते. रंगीबेरंगी फुलं, पानं, पक्षी त्यांच्या आसपास होते, अगदी हुबेहूब तसेच. त्यांच्यापैकी सर्वांत जुने जाणते कशिदाकार, खुर्शीद यांनी मुमताजचं स्वागत केलं आणि ती कुठून आली, असं तिला विचारलं. मुमताज नमस्कार करत म्हणाली, ''मी लखनौहून आले, चिकनकारी करते.''

खुर्शीदनं हातातली भरतकाम चालू असलेली शाल दाखवत तिला म्हटलं, ''हे बघ बाळ, काश्मीरची सगळी फुलं आणि पक्षी मी इथे चितारले आहेत. हे आहे गुलिस्तान म्हणजे फुलांनी भरलेला बगिचा आणि हे बुलबुल. हे जे बघते आहेस ना, त्याला आम्ही म्हणतो. चश्म-ए-बुलबुल. म्हणजे बुलबुलचा डोळा. ज्याप्रमाणे बुलबुल पक्षी आपल्या चारही बाजूंना बघू शकतो, त्याप्रमाणे या टाक्याकडे कुठल्याही दिशेनं बघितलं तरी तो तसाच दिसतो.'' असं म्हणून त्यांनी तो टाका मुमताजला शिकवला.

मुमताज तो नवा टाका चटकन शिकली आणि तिची बोटं शालीवरून सरसर फिरू लागली. थोड्या वेळानं खुर्शीदनं, मुमताज आणि मुन्नूला कहवा म्हणजे काश्मिरी चहा आणि गरमागरम नान दिले. पूर्वीच्या काळी काश्मिरी कशिदाकारांनी, लखनौला नबाबांच्या दरबारी जाऊन चिकनकारी करणाऱ्यांबरोबर कसं काम केलेलं आहे, हेही त्यांनी सांगितलं.

थोड्याच वेळात लक्का आणि लोटन परत आले आणि आपल्या नव्या मित्रांचा निरोप घेऊन मुमताज पुन्हा लखनौच्या दिशेनं उडायला लागली आणि क्षणातच ती आबिदा खालाच्या घरात होती. मुन्नूशी ती काही बोलणार, एवढ्यात मुन्नूच्या वडिलांची हाक आली आणि मग तो धावत घरी गेला.


मुमताज आपल्या भरतकामात गढून गेली. डोक्यात फेर धरून होते, तिने त्या अद्भुत सफरीत बघितलेले नक्षीकामचे नवे नवे नमुने. थोड्याच दिवसांत फुलं, पानं पक्षी भरलेला एक अप्रतिम कुडता तिनं तयार केला आणि प्रत्येक नक्षीच्या मधोमध होता चश्म-ए-बुलबुल. हे सुंदर आणि कल्पक काम बघून वस्तीतल्या बायका अगदी चकित झाल्या. मेहरु आणि कमरु यांना आनंद होण्याऐवजी त्या आपल्या मावसबहिणीवर जळायला लागल्या.

''मुमताज कुठे बाहेर जात नाही, काही बघत नाही. मग ही इतकी सुंदर नक्षी तिला कशी सुचली? कसे एवढे चांगले रंग वापरले तिनं?'' मेहरु खट्टू होत म्हणाली.

''हो; पण लवकरात लवकर आपल्याला काहीतरी करायला हवं. नाहीतर सतत असंच कौतुक तिच्या वाट्याला यायचं.'' कमरु म्हणाली.

लवकरच दोघींनी एक युक्ती शोधली. एके दिवशी लक्का आणि लोटन यांना दाणे आणण्यासाठी मुमताज बाहेर गेली होती, तेवढ्यात या दोघींनी भरतकामाचं तिचं रंगीत कापड आणि रंगीत दोरे लपवून ठेवले. आता फक्त पांढरं कापडच शिल्लक राहिलं. मेहरु अंगठा नाचवत म्हणाली, ''बघू या आता तिचं कसं काय कौतुक होतं ते.''







दुसऱ्या दिवशी मुन्नूनं बघितलं की मुमताज उदास होऊन कबुतरांजवळ बसली होती. मुन्नूनं विचारल्यावर, आता आपल्याकडे फक्त पांढरंच कापड कसं आहे आणि पांढरं कापड लवकर मळत असल्यानं त्यावर काम करणं किती. अवघड असतं हे मुमताजनं सांगितलं ''आणि रंगीत दोरेही नाहीत, मग भरतकाम कसं करणार?'' मुमताज दुःखी होत म्हणाली.

''अशी उदास होऊ नकोस आपा ''मुन्नू म्हणाला, आण बरं तुझ्या आजीची चादर आणि बघ कुठल्या जादूच्या नगरीत जाऊन पोहोचतेस ते.''

आणि ठाऊक आहे, या वेळी मुमताज उडत-उडत कुठे पोहोचली ते? एका प्राचीन नगरीत. तिथे रंगच नव्हते. कितीतरी लोक होते तिथे. काही पायी जात होते. तर काही झोकदार बग्गीमधून; पण आश्चर्याची गोष्ट अशी की प्रत्येकाच्या अंगावर फक्त पांढरेच कपडे होते. सुंदर भरतकाम केलेले तलम, मुलायम, चमकदार पांढरे! आणि काय आश्चर्य, मुमताजला तिची आजी दिसली. एका मोठ्या रस्त्याच्या कडेला, कडुनिंबाच्या झाडाखाली एका पांढऱ्या बाकावर ती बसली होती. ''आजी, आजी', मुमताज आनंदानं हाका मारत आजीजवळ गेली आणि तिच्या गळ्यात पडली.

आजीनं मायेनं कुरवाळत तिला विचारलं, ''बाळा इतकी दुःखी का दिसतेस तू? अग, तुला माहीत नाही. पण अस्सल चिकनकारी ही कधीच रंगीत कपड्यावर करत नाहीत. पिढ्यान् पिढ्या पांढऱ्या मलमलवरच चिकनकाम केलं गेलं. कारण मुख्यतः पुरुषांना घालण्यासाठी केलेले कपडे होते ते. आता बायकाही चिकनचे कपडे घालायला लागल्यावर मग लोकांनी रंगीत कपड्यांवर चिकनकाम करायला सुरवात केली. पण खरं सांगायचं तर पांढऱ्या मलमलच्या कापडावर पांढऱ्याच दोऱ्यानं केलेलं काम म्हणजेच अस्सल चिकनकारी. तेच चिकनकारीचं मर्म आणि गाभा आहे... असं काम करणाऱ्या स्त्रीचं कौशल्य अगदी पणाला लागतं.



या जादूनगरीतून मुमताज जेव्हा परत आली, तेव्हा तिनं एक मोठं, पांढरं कापड घेतलं आणि त्यावर पांढऱ्या धाग्यानं फुलं भरायला सुरुवात केली. हरदोईचे आंबे आणि काश्मीरचे बदाम यांच्या पानांसारखी दिसणारी पानं तिनं काढली आणि फुलझाडांच्या मधोमध होता, एक डौलदार मोर! सगळं इतकं मोहक होतं की जणू जादूचीच चादर होती ती!

मुमताजच्या कामाचा एवढा बोलबाला झाला की चिकनकारीचे घाऊक व्यापारी आणि इतर सगळ्यांच्या तोंडी हरदोई गावच्या एका छोट्या कलाकार मुलीचंच नाव होतं.

काही प्रतिष्ठित, श्रीमंत स्त्रिया अबिदा खालाकडे आल्या आणि आपल्या प्रदर्शनात मुमताजचं चिकनकाम ठेवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

आता मात्र कमरु आणि मेहरुच्या जल्लोषाला पारावारच राहिला नाही. मुमताजला आता आणखी प्रसिद्धी मिळायला

नको यासाठी त्यांनी आणखी एक डाव रचला. चिकनकारी किंवा भरतकाम करण्याअगोदर जे डिझाईन भरायच असतं, त्याचा नमुना कच्च्या रंगानं त्या कापडावर छापला जातो. भरतकाम पूर्ण झाल्यावर कापड धुतलं की हा कच्चा रंग निघून जातो.

कमरु आणि मेहरुनं ठरवलं की, मुमताजला ही डिझाइन्स छापून द्यायची नाहीत. पण आता मुमताज अशा छोट्या-मोठ्या गोष्टींना मुळीच घाबरणार नव्हती. स्वप्नात बघितलेल्या एवढ्या गोष्टी मुमताजच्या डोक्यात होत्या की असल्या डिझाईनच्या नमुन्यांची तिला गरजच नव्हती.

‘‘आणि एक दिवस ती आनंदाची बातमी आली. मुमताजनं चिकनकाम केलेली ती पांढरी चादर बक्षीस विजेती ठरली होती. टाऊन हॉलमध्ये होणाऱ्या बक्षीस समारंभासाठी तिला निमंत्रण आलं. मुमताजला खूप आनंद झाला होता.

मेहरू आणि कमरू यांनीही कार्यक्रमाला यावं असा आग्रह तिनं धरला आपलं वागणं आठवून आता खजील होण्याची पाळी या दोघींची होती.

मुमताजचं किती कौतुक होतंय आणि तिला केवढा मान दिला जातोय, ते कमरू आणि मेहरू यांनी कार्यक्रमात बघितलं. काही जणांनी तर अशा गुणी मुलीच्या त्या बहिणी असल्याबद्दल त्यांचंही अभिनंदन केलं.

समारंभाहून घरी परतल्यावर कमरुनं मुमताजला शेवटी विचारलंच, ''डिझाईनचे इतके एकाहून एक सरस नमुने तू कुठून आणलेस?''

काही क्षण मुमताज गप्प बसली.
मग तिला वाटलं की आपल्या त्या जादूचं
गुपित या बहिणींनाही सांगावं. हसत-हसत
कमरुला ती म्हणाली, ''बघं हं, ही आजीची चादर.
याचं एक टोक तू पकड आणि अगदी मन लावून विचार कर''
कमरुनं एक टोक पकडलं; पण तिला कसलाच बोध होईना. काय
म्हणत होती मुमताज? तिला तर 'गुटर गूँ' करत करामती करणारे लक्का-लोटन
आणि मुनिया दिसत होते. यापलीकडे आणखी काहीच नाही!





### चित्रांविषयी

कागद कापून काढण्यात येणारी पारंपरिक 'साँझी' चित्रशैली उत्तर प्रदेशातील मथुरा आणि वृंदावन येथे आजही टिकून आहे. पूर्वीच्या काळी लोक झाडांची पातळ साल वापरत असत; पण आज विविध प्रकारचे कागद वापरले जातात. या शैलीतल्या मोठ्या चित्रांमध्ये धार्मिक प्रसंग, फुलं-पानं, कपड्यांवरची नक्षी किंवा भौमितिक आकृत्या काढल्या जातात. बारीक कलाकुसर असलेली ही शैली मूर्ती सजवण्यासाठी, देवतांच्या चित्रांची स्टेन्सिल काढण्यासाठी वापरली जाते. चित्र उठून दिसावं म्हणून स्टेन्सिलच्या खाली रंगीत किंवा धातू कागद लावतात.

**दस्तकारी हाट समिती** ही पारंपरिक हस्तकलांमध्ये काम करणाऱ्या कारागिरांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावा म्हणून झटणारी, कारागिरांची मोठी संघटना आहे. विविध सांस्कृतिक अभिव्यक्तींचा परिचय व्हावा यासाठी चार पुस्तकांच्या या मालिकेत त्या त्या स्थानिक शैलीतली चित्रं 'सजावट' म्हणून वापरली आहेत. त्यासाठी युनेस्को, नवी दिल्ली या संस्थेचं सहकार्य मिळालं.

# Read India

प्रथम बुक्सची स्थापना २००४ मध्ये झाली. मुलांच्या वाचनाला चालना देण्यासाठी, 'रीड इंडिया' नावाचा उपक्रम राष्ट्रीय पातळीवर सुरु झाला होता. त्याच चळवळीचा एक भाग म्हणून ही स्थापना झाली. प्रथम बुक्स ही अनेक भारतीय भाषांमध्ये, दर्जेदार पुस्तकं प्रकाशित करणारी ना-नफा संस्था आहे. 'प्रत्येक मुलाच्या हाती पुस्तक' हे आमचं ध्येय असून, त्याद्वारे भारतातल्या सर्व मुलांपर्यंत वाचनाचा आनंद पोहोचवायचा आहे. यात कोणत्याही प्रकारे सहभागी होण्यासाठी info@prathambooks.org या पत्यावर इमेल पाठवा.

---

जॉली रोहतगी, 'जनमाध्यम' या स्वयंसेवी संस्थेमार्फत विशेष गरज असलेल्या मुलांसाठी काम करतात. बिहार, झारखंड, ओरिसा आणि उत्तर प्रदेश येथील कारागिरांचं आयुष्य, त्यांच्या आर्थिक गरजा यावर त्यांनी संशोधनपर लेखन केलं आहे. कलेचा ध्यास घेतलेल्या जॉली यांनी या विषयावरील अनेक उपक्रम, प्रदर्शनं यासाठी काम केलं आहे. 'ऑक्सफॅम इंडिया ट्रस्ट', 'ऑक्सफॅम वेरल्ड विंकल्स' (बेल्जियम) 'ले मॅगासीन दू मॉद' आणि 'युएनडीपी' या संस्थांशी त्या जोडलेल्या आहेत.

राम सोनी हे 'सांझी' या पारंपरिक चित्रकलेतले जानेमाने कलाकार मानले जातात. उत्तर प्रदेशातील 'वृंदावन' येथे ते राहतात. कागद कापून तयार झालेल्या या चित्रशैलीचा उपयोग पहिल्यांदाच पुस्तकाच्या सजावटीसाठी करण्यात आला आहे. राम सोनी यांना त्यांच्या या शैलीतील कौशल्याबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

गावामधल्या अनेक बायकांसह मुमताज आपल्या खेडयात चिकनकारी, भरतकाम करत असते. काही नवे टाके शिकायला ती लखनौमध्ये येते आणि कल्पना केली होती, त्यापेक्षा कितीतरी अधिक शिकते. तिचा छोटा मित्र मुन्नूही तिला मदत करतो. जॉली रोहतगी यांच्या या भावपूर्ण कथेला राम सोनी यानी, कागदाचं कातरकाम करून तयार होणाऱ्या साँझी शैलीत चित्रं काढली आहेत.

---

**या मालिकेतील पुस्तके :**

बिजूने विणली जादू

बुली आणि वाघ

मनूच्या आनंदाचा घडा.

स्वप्ने भरत जाणारी मुमताज.

---

**टप्याटप्याने वाचायला शिकणे. या पुस्तकाची वाचन पातळी ४ आहे.**

**प्रारंभिक वाचन / मुलांना वाचून दाखवण्यासाठी**

वाचायला नुकतीच सुरुवात करणाऱ्या आणि गोष्ट ऐकायला आवडणाऱ्या छोटुकल्यांसाठी.

१

**वाचायला शिकणे**

ओळखीचे शब्द वाचू शकणाऱ्या आणि मदत घेऊन नवे शब्द वाचणाऱ्या मुलांसाठी.

२

३

**स्वतंत्रपणे वाचन**

आपले आपण वाचणाऱ्या मुलांसाठी.

**सराईतपणे वाचन**

आत्मविश्वासानं वाचणाऱ्या मोठ्या मुलांसाठी.

४

**PRATHAM BOOKS**

प्रथम बुक्स ही ना-नफा संस्था असून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजावी यासाठी अनेक भारतीय भाषांमध्ये पुस्तकं प्रकाशित करते.

www.prathambooks.org

Mumtaz Embroiders her Dreams
(Marathi)
MRP: Rs. 25.00

ISBN 978-93-5022-051-1